# फ) देशांतर्गत व्यापार व आयात विभाग

राज्यातील कृषि मालाच्या विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची संख्या कमी करुन शेतकऱ्यांना त्यांच्या कृषिमालाला चांगला भाव मिळावा व चांगल्या प्रतीचा कृषि माल किफायतशीर दरामध्ये ग्राहकांना उपलब्ध व्हावा तसेच राज्यातील कृषि मालासाठी देशांतर्गत नवनवीन बाजारपेठा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने देशांतर्गत व्यापार व आयात विभाग कामकाज करत आहे.

## उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजना :

कृषि मालाच्या विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची साखळी वगळून उत्पादकांना थेट ग्राहकाला दर्जेदार मालाची किफायतशीर दरांमध्ये विक्री करता यावी यासाठी कृषि पणन मंडळामार्फत उत्पादक ते ग्राहक थेट विक्रीचा अभिनव उपक्रम राबविण्यात येतो.

सन २०१२ -१३ या आर्थिक वर्षात उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजनेअंतर्गत आंबा उत्पादकांना आंबा विक्रीसाठी मुख्यालय आवार व यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरुड येथे एकूण २० स्टॉल्स उपलब्ध करुन देण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे व उस्मानाबाद जिल्ह्यातील एकूण ३६ हापूस व केशर आंबा उत्पादकांनी सहभाग घेतला होता. या योजनेअंतर्गत सन २०१२-१३ मध्ये एकूण रक्कम रु.१७५.०० लाख रुपयांची आंबा विक्री झालेली आहे.

## फळ महोत्सव अनुदान योजना :

उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजना राज्यातील जास्तीत जास्त ठिकाणी राबविली जावी यासाठी राज्यातील सहकारी संस्था / सहकारी संघ / बाजार समित्या / बचत गट यांना फळ महोत्सव आयोजनासाठी कृषि पणन मंडळामार्फत अनुदान देण्यात येते. या योजनेअंतर्गत खालील संस्था / बचत गट यांना अनुदान देण्यात आले.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | महोत्सवाचे नांव, दिनांक व ठिकाण | स्टॉलची संख्या | अनुदान रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | प्रगती महीला स्वयंसहायता महिला बचत गट, वांद्रे, मुंबई. | आंबा, दि.२७/०४/२०१२ ते दि.०६/०५/२०१२ व वांद्रे | ५० | ६०,००० |
| २ | जागृती महिला बचत गट, पुणे | आंबा, दि.२२/०४/२०१२ ते दि.०५/०५/२०११ व पुणे | २२ | ३२,००० |
| ३ | जिजाऊ मार्केटिंग स्वंयरोजगार महिला सहकारी सेवा संस्था, पुणे | आंबा, दि.१६/०५/२०१२ ते दि.२०/०५/२०१२ व पुणे | ५० | ३,००,००० |
| ४ | धनश्री महिला बचत गट, पुणे | आंबा, दि.१४/०४/२०१२ ते दि.२०/०४/२०१२ व पुणे | १२ | २२,००० |
| | | | **एकूण** | **४,१४,०००** |

## प्लॅस्टीक क्रेट्स अनुदान योजना :

राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत कृषि पणन मंडळामार्फत राज्यातील फळ उत्पादक शेतकऱ्यांसाठी प्लॅस्टीक क्रेट्स अनुदान योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सन २०१२-१३ मध्ये राज्यातील एकूण ७,१९७ शेतकऱ्यांचे एकूण ३,८३,९०८ क्रेट्ससाठी एकूण रक्कम रु.३.८० कोटी अनुदान वितरित करण्यात आले.